कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यंत्रणेतील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, गट-ब पदावर सरळ सेवेने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांना त्यांची पूर्वाश्रमीची सेवा विद्यमान सेवेस जोडून देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०१९/प्र.क्र.६७/प्रशा-२
मंत्रालय (मुख्य इमारत), दालन क्र.२०४, २ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०००३२
दिनांक : ०६ जुलै, २०१९

वाचा:

१. क्रमांक:कौविउ-२०१७/प्र.क्र.१७१/प्रशा-२, दि.२१/०२/२०१८
२. क्रमांक:कौविउ-२०१७/प्र.क्र.१७०/प्रशा-२, दि.२१/०२/२०१८
३. क्रमांक:कौविउ-२०१८/प्र.क्र.१५८/प्रशा-२, दि.२७/११/२०१८
४. क्रमांक:कौविउ-२०१७/प्र.क्र.१७३/प्रशा-२, दि.१२/०९/२०१८
५. क्रमांक:कौविउ-२०१८/प्र.क्र.१६/प्रशा-२, दि.०६/०८/२०१८
६. क्रमांक:कौविउ-२०१८/प्र.क्र.७६/प्रशा-२, दि.२१/०५/२०१८
७. क्रमांक:कौविउ-२०१८/प्र.क्र.७४/प्रशा-२, दि.२१/०५/२०१८
८. क्रमांक:कौविउ-२०१८/प्र.क्र.७५/प्रशा-२, दि.२१/०५/२०१८
९. शासन आदेश क्रमांक: कौविउ-२०१७/प्र.क्र.१७०/प्रशा-२, दि. १३ एप्रिल, २०१९
१०. शासन निर्णय क्रमांक:इएसई-२०१३/प्र.क्र.६४/प्रशा-२, दि.१६ डिसेंबर, २०१३
११. शासन निर्णय क्रमांक:इएसई-२०१३/प्र.क्र.६४/प्रशा-२, दि.०१ मार्च, २०१४
१२. शासन निर्णय क्रमांक:इएसई-२०१३/प्र.क्र.६४/प्रशा-२, दि.२२ जुलै, २०१४
१३. शासन निर्णय क्रमांक: अंनियो-२०१५/(NPS)/प्र.क्र.३२/सेवा-४, दि.०६ एप्रिल, २०१५
१४. शासन निर्णय क्रमांक: अंनियो-१००७/१८/सेवा-४, दि.०७ जुलै, २००७

प्रस्तावना:

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यंत्रणेतील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, गट-ब यांना पूर्वीची शासकीय सेवा जोडून देण्याबाबतचे संदर्भाधिन क्र.१ ते ८ येथील आदेश संदर्भाधिन क्र.०९ येथील आदेशान्वये रद्द करण्यात आलेले आहेत. सदर अधिकाऱ्यांची प्रथम नियुक्ती ही दिनांक ०१.११.२००५ नंतरची आहे. वित्त विभागाच्या शासन निर्णय दि.३१.१०.२००५ अन्वये दिनांक ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे. यास्तव महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ३३ नुसार पूर्वीची सेवा जोडून देण्याबाबतचे अ.क्र.१ ते ८ चे आदेश अवैध असल्याचे निदर्शनास आल्याने ते रद्द करण्यात आले. सदर अधिकाऱ्यांना आता, नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन (राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना) योजनेनुसार सेवा जोडून देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यंत्रणेतील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, गट-ब (वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४४००) या पदावर कार्यरत असलेले व सदर पदावर रुजू होण्यापूर्वी दि.०१.०१.२००५ नंतर शासन सेवेत अन्य पदावर कार्यरत असलेले व नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या पदावर कार्यरत असलेले अधिकारी परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद

केल्याप्रमाणे आहेत. सदर अधिकाऱ्यांचा निवृत्तीवेतन लेखा क्रमांक (PRAN) शासन निर्णय, वित्त विभाग, दि.०७.०७.२००७ मधील अ.क्र.२६ च्या तरतूदीनुसार बदलणार नसून सदर अधिकारी कार्यरत असलेल्या विद्यमान कार्यालयात त्याची नोंद घेण्यात येऊन सलगप्रमाणे त्याच्या अंशदानाची वसुली करणे आवश्यक आहे. वित्त विभाग शासन निर्णय, दि.२७.०८.२०१४ अन्वये राज्य शासनाने केंद्र शासनाच्या राष्ट्रीय निवृत्ती योजनेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार वित्त विभाग, शासन निर्णय, दि.०६.०४.२०१५ मधील परि. २४ मध्ये संबंधित अधिकारी/कर्मचारी राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या अन्य कार्यालयात बढतीने, पदावनतीने अथवा बदलीने किंवा इतर कोणत्याही कारणामुळे स्थानांतरीत झाल्यानंतरही एकदा दिलेला कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक (PRAN) बदलणार नाही. या (PRAN) क्रमांकाची नोंद संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतन देयक नोंदवहीमध्ये त्याच्या नावासमोर तसेच सेवापुस्तकात न चुकता घेण्यात यावी अशी तरतूद करण्यात आली आहे. यास्तव, नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या लाभाच्या प्रयोजनार्थ खाली नमूद अधिकाऱ्यांची स्तंभ ५ येथील पूर्वाश्रमीची सेवा त्यांच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यंत्रणेतील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, गट-ब (वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४४००) या पदावरील सेवेस जोडून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. दिनांक ०१.११.२००५ नंतर शासन सेवेत अन्य पदावर कार्यरत असलेले व नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या अधिकाऱ्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नाव	विद्यमान पदावर रुजू दिनांक	पूर्वाश्रमीचे पदनाम व कार्यालय	पूर्वाश्रमीच्या आस्थापनेवरील सेवेचा कालावधी
१	२	३	४	५
१	श्री. रविंद्र प्रकाश सुरवसे	०१.०८.२०१४ (म.पू)	सहाय्यक गुप्तवार्ता अधिकारी, आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई	०१.०१.२००९(म.पू) ते ०१/०८/२०१४(म.पू)
२	कु.वैशाली सेवकराम पवार	०१.०१.२०१४(म.पू)	गृहपाल, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती	२४.१२.२००८(म.पू) ते ३१.१२.२०१३(म.नं.)
३	श्रीमती भाग्यश्री प्रल्हाद वाघमारे	२७.१२.२०१३(म.पू)	महिला अधिक्षिका, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर	१३.०२.२००८ (म.नं.) ते २६.१२.२०१३(म.नं.)
४	श्रीमती अमिता मुकुंद पवार	२७.१२.२०१३(म.पू)	उपलेखापरिक्षक, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,(लेखापरिक्षण), मुंबई	२३.०५.२००८ (म.पू) ते २६.१२.२०१३ (म.नं.)
५	श्री.सुरेश राणुभाऊ वराडे	३१.१२.२०१३(म.पू)	अधिक्षक, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती	०७.०७.२००७ ते १६.०५.२००८
			गृहपाल, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती	१७.०५.२००८(म.पू) ते ३०.१२.२०१३(म.नं.)

६	श्रीमती संध्या एकनाथ चौधरी	०१.०१.२०१४(म.पू)	तांत्रिक अधिकारी, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे	०७.०७.२००८ (म.पू.) ते ३१.१२.२०१३ (म.नं)
७	श्री.गणेश प्रल्हादराव बिटोडे	३१.१२.२०१३(म.पू)	गृहपाल, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती	२०.०५.२००८ (म.पू.) ते ३०.१२.२०१३ (म.नं)

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७०६१५५११४४२४०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sangeeta Ajit Shinde

Digitally signed by Sangeeta Ajit Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development and Entrepreneurship, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ba607066e7a34e428b7c7c73de0f7e09a315a2af5075fd47f1e08389aa137b81, cn=Sangeeta Ajit Shinde
Date: 2019.07.06 15:59:28 +05'30'

(संगीता शिंदे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
२. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई.
३. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई (कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयामार्फत)
४. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी/उप कोषागार अधिकारी (कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयामार्फत)
५. सर्व उपसंचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता (कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयामार्फत)
६. सर्व सहायक संचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता (कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयामार्फत)
७. संबंधित अधिकारी (कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयामार्फत)
८. निवड नस्ती.